**ठळक बातम्या**

- संरक्षण मंत्रालयाच्या तीन कंपन्यांना मिनीरत्न श्रेणी-१ चा दर्जा

- मुंबई महानगर प्रदेशात पावसामुळे उद्भवणारी आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी नियंत्रण कक्ष १ जूनपासून सुरू होणार

- बिहारमधे ४८ हजार ५०० कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधा आणि कल्याणकारी प्रकल्पांचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण आणि पायाभरणी

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात लढत

**<><><><>**

संरक्षण मंत्रालयानं म्युनिशन्स इंडिया लिमिटेड, आर्मर्ड व्हेइकल्स निगम लिमिटेड आणि इंडिया ऑप्टेल लिमिटेड यांना मिनीरत्न श्रेणी-१ दर्जा मंजूर केला आहे. केवळ तीन वर्षात सरकारी संस्थांमधून नफा कमावणाऱ्या कॉर्पोरेट संस्थांमध्ये रूपांतरित झाल्याबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी तिन्ही सार्वजनिक क्षेत्रातल्या संरक्षण उपक्रमांचं अभिनंदन केलं. कंपनीची उलाढाल वाढवण्यासाठी, संपूर्ण स्वदेशीकरण करण्यासाठी आणि मिनीरत्न दर्जा प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर निकषांची या तिन्ही संस्थांनी पूर्तता केल्याबद्दल सिंह यांनी समाधान व्यक्त केलं. मिनीरत्न दर्जा मिळाल्यामुळे या कंपन्यांना वेगवान वाढीचा मार्ग गाठायला आणि संरक्षण उत्पादन आणि निर्यातीत नवीन उंची गाठायला मदत होईल, असा विश्वास सिंह यांनी व्यक्त केला.

**<><><><>**

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या ‘विकसित कृषी संकल्प अभियान’ या देशव्यापी अभियानाला आज पालघर आणि धाराशिव मध्ये सुरुवात झाली. गावोगावी जावून शेतकऱ्यांना खरीप हंगामाच्या अनुषंगाने मार्गदर्शन करणं, प्रयोगशील शेतकऱ्यांच्या शेतावर भेटी देणं, शासकीय योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचवणं, आधुनिक कृषी

तंत्रज्ञानाविषयी जागरूकता मोहीम राबविणं, हा या अभियानाचा उद्देश आहे. हे अभियान पालघर आणि धाराशिव जिल्ह्यातल्या ९० गावांमध्ये राबवलं जाणार आहे.

हे अभियान देशभरात राबवलं जात असून या माध्यमातून कृषी संशोधक आणि कृषी अधिकारी देशभरातल्या सातशे जिल्ह्यातल्या दीड कोटी शेतकऱ्यांशी संवाद साधतील आणि त्यांना कृषी क्षेत्रातल्या आधुनिक संशोधनाबाबत माहिती देतील. या अभियानाच्या माध्यमातून तज्ज्ञांची २ हजार १७० पथकं देशातल्या ७२३ जिल्ह्यांमधल्या ६५ हजारपेक्षा जास्त गावांना भेट देणार आहेत. यात किमान चार वैज्ञानिक असतील. या अभियानाद्वारे देशातल्या सव्वा कोटींपेक्षा अधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याचं लक्ष्य ठेवण्यात आलं आहे.

**<><><><>**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वतीनं येत्या १ जून पासून पावसाळी नियंत्रण कक्ष सुरू करण्यात येणार आहे. मुंबई महानगर प्रदेशात पावसामुळं उद्भवणारी आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी हा कक्ष २४ तास सुरु राहणार आहे. मंत्रालय, बृहन्मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका आदी आपत्कालीन नियंत्रण कक्षाबरोबर या नियंत्रण कक्षाचा समन्वय असणार आहे. नागरिकांना टोल फ्री क्रमांक १ ८ ० ० २ २ ८ ३ ८ ४, नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी क्रमांक ० २ २-२ ६ ४ २ ० ९ १ ४ आणि भ्रमणध्वनी क्रमांक ८ ९ २ ८ १ २ ८ ४ ० ६ या क्रमांकांवर संपर्क साधता येईल.

**<><><><>**

दक्षिण कोरियात सुरू असलेल्या आशियाई अॅथलेटिक्स स्पर्धेत भारताच्या अविनाश साबळेनं तीन किलोमीटर अडथळ्याच्या शर्यतीत सुवर्ण पदक पटकावलं. याबद्दल बीड जिल्ह्यातल्या मांडवा या त्याच्या आज गावी आनंदोत्सव साजरा केला जात आहे. ग्रामस्थ तसंच अविनाशच्या प्राध्यापकांनी त्याच्या कुटुंबीयांना पेढे भरवत आनंद व्यक्त केला. यावेळी अविनाशची आई वैशाली साबळे आणि वडील मुकुंद साबळे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

**बाईट - वैशाली आणि मुकुंद साबळे**

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज बिहारमधल्या काराकट इथं ४८ हजार ५०० कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधा आणि कल्याणकारी प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी केली. यात साडेपाच हजार कोटी रुपयांचा चौपदरी पाटणा - गया - दोभी महामार्ग, २४९ कोटींचा गोपालगंज महामार्ग यांचाही समावेश आहे. रालोआ सरकार बिहारच्या प्रगतीसाठी सतत प्रयत्नशील आहे, लोकांपर्यंत शांतता, सुरक्षा आणि शिक्षण पोहोचवण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

वाहतूक, ऊर्जा, रेल्वे आदी क्षेत्रांना या प्रकल्पांमुळे लाभ होणार आहे. या कार्यक्रमाच्या सुरक्षेसाठी ५ हजार सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले होते. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि राज्यपाल आरिफ मोहम्मद खान या कार्यक्रमाला उपस्थित होते.

त्यानंतर प्रधानमंत्री मोदी उत्तरप्रदेशात कानपूर इथं ४७ हजार ५७३ कोटी रुपयांच्या विकासकामांचं उद्घाटन आणि पायाभरणी करतील.

**<><><><>**

ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकव्याप्त काश्मीरच्या गोळीबारात सीमावर्ती भागातल्या मालमत्ता आणि धार्मिक स्थळांना झालेल्या नुकसानीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज पूंछ शहराला भेट दिली. तसंच पाकव्याप्त काश्मीरच्या गोळीबारात बाधित झालेल्या कुटुंबांची भेट घेतली आणि त्यांच्या तक्रारी ऐकल्या, अशी माहिती आमच्या जम्मू इथल्या प्रतिनिधीने दिली. इथल्या विश्रांती गृहावर झालेल्या कार्यक्रमात गृहमंत्र्यांनी बाधित कुटुंबांना आर्थिक मदत वाटप केली आणि गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्यांच्या नातेवाईकांना नियुक्तीपत्रेही वाटली. शहा यांनी पाकिस्तानी सैन्याने लक्ष्य केलेल्या आणि गोळीबारात नुकसान झालेल्या धार्मिक स्थळांनाही भेट दिली. ३ जुलैपासून सुरू होणाऱ्या वार्षिक अमरनाथ यात्रेसाठी सुरक्षा आणि इतर व्यवस्थांचाही शहा यांनी आढावा घेतला. यावेळी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**<><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील संबंध विविध क्षेत्रात विस्तारत असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. न्यूझीलंडचे उपपंतप्रधान आणि

परराष्ट्रमंत्री विन्स्टन पीटर्स यांच्याशी काल नवी दिल्लीत झालेल्या चर्चेनंतर जयशंकर यांनी हे विधान केलं. न्यूझीलंडचे प्रधानमंत्री क्रिस्तोफर लक्सन यांनी नुकतीच भारताला भेट दिली, त्यामध्ये उभय देशांमध्ये मुक्त व्यापार करारासंबंधीच्या वाटाघाटींना सुरुवात झाली तसंच विविध करार करण्यात आले, त्यामुळं त्यांची ही भेट यशस्वी ठरली होती असंही जयशंकर यांनी स्पष्ट केलं. या भेटीत दोन्ही देशांनी ठरविलेली उद्दीष्टं पूर्ण करण्याला सध्या प्राधान्य असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

देशाचे संरक्षण प्रमुख जनरल अनिल चौहान तीन दिवसांच्या सिंगापूर दौऱ्यावर असून ते २२ व्या शांग्री-ला संवाद परिषदेत सहभागी होणार आहेत. या महत्वपूर्ण आंतरराष्ट्रीय सुरक्षा परिषदेत जगभरातले संरक्षण नेते, लष्कर प्रमुख, धोरणकर्ते आणि धोरणात्मक तज्ञ महत्त्वाच्या जागतिक आणि प्रादेशिक सुरक्षा मुद्द्यांवर एकत्रित चर्चा करतील. यावेळी चौहानदेखील विविध देशांच्या मुख्य संरक्षण अधिकाऱ्यांसोबत आणि नेत्यांबरोबर जागतिक सुरक्षा आव्हानांवर आणि परस्पर सहमत मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करणार आहेत.

**<><><><>**

दहशतवादा विरोधात भारताची भूमिका जगाला पटवून देण्यासाठी गेलेल्या भारताच्या सर्वपक्षीय शिष्टमंडळाने काल सौदी अरेबियातल्या तीन दिवसांच्या राजनैतिक मोहिमेचा समारोप केला. या शिष्टमंडळाचं नेतृत्त्व भाजपा खासदार बैजयंत पांडा यांनी केलं. त्यांच्या सौदी भेटीदरम्यान, भारतीय प्रतिनिधींनी रियाधमधील गल्फ रिसर्च सेंटरचे अध्यक्ष डॉ. अब्दुल अजीज सागर आणि नायफ अरब युनिव्हर्सिटी फॉर सिक्युरिटी सायन्सेसचे अध्यक्ष डॉ. अब्दुलमाजीद अल्बानयान यांची भेट घेतली.

**<><><><>**

चालू आर्थिक वर्षात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारत आपलं स्थान कायम ठेवेल असं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे. सरकारचा भांडवली खर्चावर भर, खासगी क्षेत्राची वाढ, बँका आणि भांडवली बाजारांचा अचूक ताळेबंद यामुळे भारताची अर्थव्यवस्थेची वाढ कायम राहिल्याचं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे. उत्पादन क्षेत्रात चालू आर्थिक वर्षात वाढ

अपेक्षित आहे. यासाठी सरकार सकारात्मक धोरण राबवत असल्याचंही रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे.

**<><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्स आणि  गुजरात टायटन्स यांच्यात सामना होणार आहे. यातील विजेता संघ १ जून रोजी पात्रता फेरीच्या दुसऱ्या सामन्यात पंजाब किंग्ज संघाबरोबर खेळेल. आणि या सामन्यातील विजेता संघ ३ जूनला अहमदाबादमध्ये अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूशी लढत देईल.

चंडिगडमध्ये काल झालेल्या पात्रता फेरीच्या पहिल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघानं पंजाब किंग्जवर ८ गडी राखून विजय मिळवला आणि स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. पंजाब किंग्ज संघानं दिलेलं १०२ धावांचं आव्हान रॉयल चॅलेंजर्सनं केवळ १० षटकांत दोन गड्यांच्या मोबदल्यात पार केलं.

**<><><><>**

भंडारा जिल्ह्यातल्या लाखनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कृषी केंद्रात १२९ मेट्रिक टन बोगस खत आढळल्याप्रकरणी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या  सचिवासह दोघांना अटक झाली आहे. तर खत कंपनीचा मालक आणि वितरक याना अटक करण्यासाठी पोलीस रवाना झाले आहेत.

**<><><><>**

नांदेडमधल्या हदगाव तालुक्यातल्या गारगव्हाण गावालगत असलेल्या खदानीत बुडून दोन मुलांचा काल मृत्यू झाला. खदानीत पोहण्यासाठी गेले असता पाण्याचा अंदाज न आल्याने ही मुले बुडाली.

**//<><><><>//**